नियमीत फौजदारी खटला क्र. **१५८/२०२४**
निशाणी क्र. **०७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुनंदा प्रभाकर राऊत** |
| वय सुमारे | : | ८२ वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | मु. आगरआळी, रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

माझ्या घरी मी एकटीच असते. माझा मुलगा ठाणे येथे असतो. घटना गेल्या वर्षी जुलै महिन्यात २३ तारखेला रात्री ११.०० वाजता घडली होती. त्या दिवशी मी माझ्या स्वयंपाक खोलीच्या बाजूला देवघराजवळ उभी होते त्यावेळी अचानक चोर आला व त्याने माझी मान पकडली व तोंडावर काहीतरी काळे टाकले त्यामुळे मला गुंगी आली व मी बेशुद्ध पडले. तो चोर माझ्या छातीवर जोरजोरात फटके मारु लागला त्यामुळे मला शुद्ध आली. मी शुद्धीवर आल्यावर पाहिले की तो चोर पळून गेला होता. शुद्ध आल्यावर माझे हातपाय टॉवेलने बांधलेले होते. शुद्धीवर आल्यावर मी माझे हातपाय सोडवले व पाहिले की, माझा घराचा दरवाजा व कपाट उघडा होता. मी माझा पुतण्या रवी याला घराच्या मागे जावून हाक मारली. माझ्या घरातील सगळे कपाट उघडे होते. माझ्या घरातून कानातील सोन्याचे कुडी व गळ्यातील सोन्याची माळ, कानातील सोन्याच्या रिंगा इत्यादी वस्तू चोरीला गेल्या होत्या. त्यानंतर माझा पुतण्या आला व त्याने पोलीसांना बोलावले. शेजारची माणसे जमा झाली होती. १२.०० ते १२.३० वाजता पोलीस घरी आले होते. मला सरकारी रुग्णालयात नेले होते. मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मला माझी फिर्याद दाखवण्यात आली. आता मला

दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. ८** देण्यात येते. पोलीस पंचनामा करण्यासाठी आले होते. माझे चोरीला गेलेले सोन्याचे दागिने पोलीसांनी मला परत दिले. पोलीसांनी चोराला पकडले होते. मी चोराला पाहिल्यास ओळखू शकेन. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. मी आज सोन्याचे दागिने न्यायालयात सोबत आणलेले आहेत. सोन्याव्यतिरिक्त माझ्या घरातील रुपये १,९००/– चोरीला गेले होते. पोलीसांनी मला ९००/– रुपये परत दिलेले आहेत.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. कुणाल गावंड यांचेमार्फत</u>** :

०२. मला हे सांगता येणार नाही की, त्या दिवशी माझ्या घरी किती चोर आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी चोरांना पाहिले नव्हते. तक्रार पोलीसांना रवीने दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी तक्रारीवर फक्त सही घेतली होती. मी रवीला सांगितले होते की, माझ्या रिंगा चोरीला गेल्या होत्या. पोलीसांनी मला चोर दाखवला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा चोरीशी काहीही संबंध नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**

दिनांक : **०७/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५८/२०२४**
निशाणी क्र. **१२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **शहानवाज करीम अत्तार** |
| वय सुमारे | : | ५३ वर्षे, व्यवसाय : लेखनिक, ग्रुपग्रामपंचायत रेवदंडा |
| निवासस्थान | : | मु. रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०१. दि. २७/०७/२०२४ रोजी मला आणि पोलीस पाटील म्हात्रे यांना रेवदंडा पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यावेळी पोलीस ठाण्यात आरोपी रोटकर, पोलीस कर्मचारी व पंच हजर होते. पोलीस ठाण्यात आम्हाला बसवले व पोलीसांनी आरोपीचा जबाब नोंदवला. आरोपीने निवेदन दिले की, त्याने चोरी केलेली आहे व मी तो माल दाखवतो. त्यानंतर पोलीसांनी तेथे पंचनामा केला. मी तो पंचनामा ओळखतो. आता मला दाखवण्यात आलेला निवेदन पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही, आरोपीची व दुसऱ्या पंचांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. १३** देण्यात येते.

०२. त्यानंतर आम्ही सरकारी वाहनाने आरोपीच्या घरी त्याने सांगितल्याप्रमाणे गेलो. आरोपीने त्याचे घर दाखविले होते. आरोपीचे घर रेवदंडा येथील आगर आळी येथे होते. आरोपीने त्याच्या हॉलमधील पलंग उघडून आतमधून पैसे व दागिने काढून दिले. दागिन्यांमध्ये कानातील व गळ्यातील दागिने होते. पोलीसांनी सदर वस्तू जप्त केल्या. पैसेही पोलीसांनी जप्त केले होते. पंचनामा करुन त्याच्यावर आमची सही घेतली होती. आता मला दाखवण्यात

आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १४** देण्यात येते.

०३. आता मला दाखवण्यात आलेल्या चार फोटोंमधील दागिने व पैसे माझ्यासमक्ष जप्त करण्यात आलेले होते. फोटोज **आर्टीकल 'अ'** ते **'ड'** देण्यात येत आहे. मी आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकेन. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. कुणाल गावंड यांचेमार्फत</u>** :

०४. मी पंचनाम्यावर किती सह्या केल्या हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सर्व सह्या पोलीस ठाण्यात केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पंचनाम्यावरील सह्या पोलीसांनी पोलीस ठाण्यात घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे घर मला पूर्वीपासून माहीत आहे. साक्षीदार सांगतो की, आरोपी माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्याच्या घरी चोरी झाली होती त्यांचे घर मला माहिती आहे.

०५. मला पत्र आले नव्हते. साक्षीदार सांगतो की, मला फोन आला होता. हे म्हणणे खरे नाही की, निवेदन पंचनामा मी जाण्यापूर्वीच तयार होता. हे म्हणणे खरे नाही की, मी निवेदन पंचनामा वाचून पाहिला नव्हता. दोन्ही पंचनामे अंदाजे १२:०० वाजता संपले होते. माझ्या ड्युटीची वेळ सकाळी ९:४५ ते सायं. ५:४५ अशी आहे. मी पंचनाम्यासाठी जाण्याचे कारण की मला पोलीसांनी फोन करुन बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला काय जप्त करायचे आहे याची आधीच माहिती दिली होती. माझ्या हे लक्षात नाही की, मी मनोज

रोटकर यांच्या घरच्यांना माझी व पोलीसांची अंगझडती दिली होती किंवा नाही. ज्या घरात गेलो होतो त्या घराचा घर क्रमांक पोलीसांनी माझ्यासमक्ष तपासून पाहिलेला नाही. मला सरकारी गाडीचा क्रमांक आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी गाडी स्वत:हून रोटकरच्या घरी घेतली होती. मला हे लक्षात नाही की, पोलीसांनी पलंगाचे मोजमाप घेतले होते की नाही. पलंगामध्ये किती खण होते हे माझ्या लक्षात नाही. हे माझ्या लक्षात नाही की, पोलीसांनी एकूण किती वस्तू जप्त केल्या होत्या. पोलीसांनी माझ्या समक्ष वस्तूचे वजन केले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष सोनाराला बोलावले नव्हते.

०६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने निवेदन दिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मुद्देमाल काढून दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरपंचांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फोटोमधील दागिने पोलीसांनी मला दाखवले होते त्यामुळे मी ओळखत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मदत करण्यासाठी मित्राविरुद्ध खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०९/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५८/२०२४**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **स्वप्निल पांडुरंग तांबडकर** |
| वय सुमारे | : | ४६ वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. आगरकोट, रेवदंडा, ता. अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. २४/०७/२०२४ रोजी मला पोलीस किरवले यांनी पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यानंतर आम्ही आगर आळी येथे सुनंदा प्रभाकर राऊत यांच्या घरी गेलो. तेथे घटनास्थळाचा पंचनामा केला. पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळ सुनंदा राऊत यांनी दाखवले व एक गुलाबी रंगाचा व त्यावर काळ्या रेषा असलेला टॉवेल जप्त केला. पोलीसांनी कपडा जप्त केला. मला पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. २ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १८** देण्यात येते.

०२. मुद्देमाल खाकी लखोट्यात असून लखोट्यांना लेबल लावलेले आहेत. सदरच्या दोन्ही खाकी लखोट्यांना लाखेचे सिल आहे. सदरचे लखोटे आरोपीच्या वकीलांसमक्ष न्यायालयात उघडण्यात आले. दोन्ही लखोट्यांमध्ये एक एक टॉवेल आहे. दोन्ही टॉवेलना **आर्टीकल 'इ'** व **'फ'** देण्यात येते. सहयांच्या लेबलवर माझी अनु. क्र. २ वर माझी सही आहे.

०३. दि. ३०/०७/२०२४ रोजी मला पोलीस ठाण्यात सोन्याचे वजन

करण्याकरीता बोलावले होते. वजन करण्याकरीता भैरव ज्वेलर्सचे निलेश जैन आले होते. त्या ठिकाणी दागिन्यांचे वजन करण्यात आले व त्याबाबतचा पंचनामा करण्यात आला. त्यांनी दागिने सोन्याचे असल्याबाबतचा दाखला दिला होता. पोलीसांनी सोने जप्त केले होते व त्याचा पंचनामा केला. मला पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. २ वर माझी, निलेश जैन यांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. १९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. कुणाल गावंड यांचेमार्फत</u>** :

०४. मला पंचनाम्याकरीता फोन करुन बोलावण्यात आले होते. मला सकाळी ९:३० वाजता फोन करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे माझ्या परिचयाचे ठिकाण आहे. मी फिर्यादीला ओळखतो. मी फिर्यादीच्या घरी दुपारी ०१:०० वाजता पोहोचलो. मी घटनास्थळी जाताना माझ्या खाजगी वाहनाने गेलो. मी रेवदंडा गावाचा पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला पंचनाम्यासाठी हजर राहण्यासाठी लेखी पत्र नव्हते. घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकवस्ती आहे. मी फिर्यादीच्या घरी गेलो त्यावेळी तेथे फिर्यादी व त्यांचा मुलगा होते. फिर्यादी ही वयस्कर आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे फिर्यादीच्या मुलाने दाखवले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घराचा नंबर तपासून पाहिला नव्हता.

०५. पोलीसांनी माझ्या समक्ष घराच्या कोणत्याही भागाचे ठसे घेतले नाहीत. पोलीसांनी श्वानपथक बोलावले नव्हते. मला हे आठवत नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष टॉवेल व फडक्याचे मोजमाप घेतले होते किंवा नाही. हे

म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने माझ्या समक्ष काय चोरीला गेले होते हे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष घराचे अक्षांश रेखांश मोजले नव्हते. पंचनाम्यासाठी अर्धा तास गेला होता. पंचनामा १:०० वाजता सुरु होवून १:३० वाजता संपला असे बोलल्यास बरोबर होईल. मी पंचनाम्यावर एकूण तीन सह्या केल्या होत्या.

०६. दि. २४/०७/२०२४ रोजी पंचनामा झाल्यानंतर मी माझ्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा रेवदंडा येथील आहे. पोलीसांनी मला गुन्हा क्रमांक सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, गावात काही भानगडी झाल्यास मी पोलीस ठाण्यात जातो. हे म्हणणे खरे आहे की, मी मिटींगसाठी पोलीस ठाण्यात जातो. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४/०७/२०२४ रोजी मी पंचनाम्यासाठी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात पंचनाम्यावर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष दोन टॉवेल व एक कपडा जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, टॉवेल मार्केटमध्ये सहज उपलब्ध आहेत.

०७. पोलीसांनी मला ३० तारखेला पुन्हा बोलावले होते. पोलीसांनी मला फोन करुन बोलावले होते पत्र दिले नव्हते. ३० तारखेला मला दुपारनंतर बोलावले होते. पोलीसांनी अंदाजे दुपारी ३:०० नंतर बोलावले होते. मी अंदाजे १० मिनिटांनी तेथे पोहोचलो होतो. पोलीस ठाण्यात दुसरे पंच, सोनार निलेश जैन व पोलीस किरवले व पोलीस कारकून हजर होते. मी गेलो त्यावेळी मुद्देमाल प्लॅस्टीकच्या पिशवीत काट्याच्या बाजूला ठेवलेला होता. एकूण किती वस्तू होत्या ते मी हातात घेवून पाहिल्या नाहीत. इलेक्ट्रॉनिक कंपनीचा वजनकाटा होता. तो काटा कोणत्या कंपनीचा होता हे मला आठवत नाही. मला कॅलीब्रेशन म्हणजे

काय हे मला माहिती नाही. वजनकाट्याची कमीत कमी व जास्तीत जास्त क्षमता माझ्या समक्ष तपासली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, किमान व कमाल क्षमता दाखवली नव्हती. वजनकाटा शून्य करुन दाखवला होता.

०८. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दागिन्यांचे वजन सांगता येणार नाही. दागिने नवीन होते किंवा जुने होते याबाबत मी सोनाराला विचारले नव्हते. सोनार दागिन्यांचे वजन करत असताना फिर्यादी हजर नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वजन करण्यापूर्वी दागिने सिल केलेले नव्हते. वजन करण्यासाठी अंदाजे २० मिनिटे लागली होती. मी सोनाराचा परवाना पाहिला होता. मी ज्वेलरला ओळखतो. पंचनामा ३:३० वाजता संपला असावा. कोणत्या गुन्ह्यातील मुद्देमाल आहे हे मला पोलीसांनी सांगितले नव्हते. पोलीसांनी मुद्देमाल कोठून जप्त केला होता हे मला सांगितले नव्हते.

०९. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष मुद्देमाल जप्त केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मुद्देमालाचे वजन केले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटील असल्याने पोलीसांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१५/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५८/२०२४**
निशाणी क्र. **२२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **नितिन सुदाम म्हात्रे** |
| वय सुमारे | : | ४० वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. बोरघर, पो. बापळे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. ३०/०७/२०२४ रोजी मला रेवदंडा पोलीस ठाण्यात बोलावले होते. निवेदन पंचनाम्याकरीता मला पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीस ठाण्यात पोलीसांनी मला आरोपी दाखवला. आरोपीने सांगितले की, तो बोरमाळ आहे ती तो स्वत: दाखवतो व त्याच्यासोबत चला. पोलीसांनी निवेदन पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला निवेदन पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व आरोपीची माझी सही आहे. पोलीस ठाण्यात आरोपीने मुद्देमाल कुठे ठेवला आहे हे सांगितले नव्हते.

०२. त्यानंतर आम्ही गाडीत बसलो. आरोपीने रेवदंडा किल्ला सातखाणी बुरुज येथे गाडी नेण्यास सांगितली. तेथे एक छोटी रुम आहे त्या रुममध्ये आरोपी गेला. आरोपीसोबत आम्ही गेलो. आरोपीने निळ्या रंगाची पिशवी काढून दाखवली. त्यामध्ये सोन्याची बोरमाळ होती. पोलीसांनी मुद्‌देमाल जप्त केला व त्यावर आमच्या सह्या घेतल्या. पोलीसांनी इ–साक्ष मोबाईलमध्ये फोटो काढले व मुद्‌देमाल ताब्यात घेतला. पोलीसांनी पंचनाम्यावर माझ्या सह्या घेतल्या होत्या. आता मला दाखवण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर

बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. ०२ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २३** देण्यात येते.

०३. आता मला दाखवण्यात आलेल्या फोटोमधील बोरमाळ तिच आहे. फोटोमध्ये बोरमाळ, कानातले व कानातील साखळी दिसत आहे. ते पोलीसांनी जप्त केले होते. तीन फोटो साक्षीदारास दाखवण्यात आले. सदर तीन फोटोंना **निशाणी क्र. २४/१** ते **२४/३** देण्यात येते.

०४. आता मला दाखवण्यात आलेला निवेदन पंचनामा तोच आहे. निवेदन पंचनाम्यातील 'मी पासून ते ........... माझ्यासोबत चला.' या मजकूरास **निशाणी क्र. २५** देण्यात येते.

०५. आरोपी आज कोर्टात हजर आहे. त्यास मी पाहिल्यास ओळखू शकेन.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. कुणाल गावंड यांचेमार्फत</u>** :

०६. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी हजर राहण्यासाठी पत्र दिले नव्हते फोन केला होता. मी प्रविण मोरे याला ओळखतो. मी दहा वर्षापासून पोलीस पाटील म्हणून काम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना मदत करण्यासाठी साक्षीसाठी जातो. हे म्हणणे खरे नाही की, मी नेहमी पोलीसांना पंच म्हणून मदत करतो. मी शेती करतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या तारखेप्रमाणे ते पावसाचे दिवस आहेत.

०७. पोलीसांनी फोन केला त्यावेळी मी घरी होतो. फोन मला ९:३० वाजता आला होता. माझे गाव ते पोलीस ठाणे यांतील अंतर अर्धा तासाचे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, चोरी झाली हे मला अगोदरपासून माहिती होते. मी एकटाच पंचनाम्यासाठी गेलो होतो. मी माझ्या मोटरसायकलने गेलो होतो. मी १०:०० ते १०:१५ वाजता पंचनाम्याकरिता पोहोचलो. मी व मोरे एकदमच पोहोचलो होतो. पोलीसांनी लगेचच पंचनाम्याला सुरु केले. पोलीसांनी पंचनामा १०:१५ चालू केला तर ते बरोबर होईल. पंचनाम्यासाठी अर्धा तास लागला होता. पंचनामा ११:०० ते ११:३० वाजता संपला होता. पूर्ण पंचनाम्यासाठी दिड तास गेला असेल.

०८. आम्ही गेलो त्यावेळी आरोपी साहेबांच्या समोर बसलेला होता. आरोपी व साहेब अगोदर बसले होते. मी व मोरे नंतर गेलो. हे म्हणणे खरे नाही की, मी गेलो त्यावेळी पंचनामा लिहून पूर्ण झाला होता. आरोपीने काय सांगितले होते हे मी सांगू शकतो. आरोपीने सांगितले होते की, मी गुन्ह्याची कबुली देतो आणि गुन्हा कुठे केला होता ते ठिकाण दाखवण्यासाठी मी तुम्हाला सोबत घेवून जातो.

०९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्यासमक्ष तारीख व वेळ सांगितली होती. तारीख ०१/०६/२०२४ वेळ १२:३० होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तारीख व वेळ सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, जाण्यापूर्वीच काय घडणार होते याची कल्पना आम्हाला होती. निवेदन पंचनामा, जप्ती पंचनामा झाल्यानंतर इ–साक्ष नोंद झाल्यानंतर आम्ही तेथून निघालो होतो. पोलीसांनी मला कोणत्या गुन्ह्याकरीता बोलावले होते तो गुन्हा क्रमांक मला सांगता येणार नाही. आम्ही पोलीसांच्या गाडीने जप्तीच्या ठिकाणी गेलो होतो. गाडी क्रमांक मला सांगता येणार नाही. एक पोलीस गाडी होती व दोन मोटरसायकल होत्या. आरोपी मागच्या सीटवर बसला होता.

१०. हे म्हणणे खरे नाही की, रेवदंडा किल्ल्यापर्यंत जाण्याकरीता पोलीस ठाण्यापासून दोन मार्ग आहेत. बाईकवाले गाडीच्या मागे होते. गाडी मगर पोलीस चालवत होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यापासून ते किल्ल्यापर्यंत मगर यांनी गाडी चालवली होती. किल्ल्याच्या आतमध्ये गाडी थांबवली होती. गाडी जिथे थांबवली होती तेथून घटनास्थळ १० फुटांच्या अंतरावर होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ज्या ठिकाणी गेलो होतो त्या ठिकाणी कोणीही येवू जावू शकतो. जागा कोणाच्या मालकीची आहे याची मी माहिती घेतली होती. मी भाडेकरार पाहिला नव्हता. मी उतारा पाहिला नव्हता.

११. आम्ही ज्या ठिकाणी गेलो तेथून एकूण दोन रुम होत्या. आम्ही ज्या रुममध्ये गेलो तेथे रुम नंबर टाकलेले नव्हते. मी रुमचा अॅसेसमेंट उतारा पाहिला नाही. रुमला लॉक लावलेले होते. रुमचे लॉक आरोपीने उघडले होते. आरोपीने ते चावीने उघडले होते. रुममध्ये सामान होते. आरोपीने निळ्या रंगाची पिशवी काढली हे पंचनाम्यात लिहीले होते का याची मी खात्री केली होती. निळ्या रंगाची पिशवी नव्हती असे म्हटल्यास ते खोटे होईल. पिशवी कापडाची होती. हे म्हणणे खरे आहे की, पिशवीला गाठ मारुन ठेवली होती. पिशवीच्या गाठी आरोपीने सोडवल्या होत्या. आम्ही रुममध्ये जाण्याआधी आरोपीला आमची अंगझडती दिली नव्हती. पिशवीचे गाठोडेच होते.

१२. एकूण तीन वस्तू सापडल्या होत्या. बोरमाळ, कानातले व कानातली साखळी. रोख रक्कम सापडली नव्हती. पोलीसांनी पिशवी जप्त केली होती. पोलीसांनी तिन्ही वस्तू जप्त केल्या होत्या. पोलीसांनी तिन्ही दागिन्यांची नोंद पंचनाम्यात घेतली होती. मी ती नोंद वाचून पाहिली होती. दागिन्यांचे वजन माझ्या समक्ष केले नव्हते. मी पंचनाम्यातील मजकूर वाचून खात्री केली होती. हे म्हणणे

खरे आहे की, मला दाखवण्यात आलेल्या पंचनाम्यात एकाच दागिन्याची नोंद केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेला पंचनामा हा नाही. हे म्हणणे खरे नाही की, तीन दागिने जप्तीचा वेगळा पंचनामा पोलीसांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तीन वस्तू पोलीसांनी मला दाखवल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, एका दागिन्याचा उल्लेख पंचनाम्यात केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दोन वस्तूंचा उल्लेख पोलीसांनी पंचनाम्यात केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन वस्तूंचा उल्ल्ेख पोलीसांनी पंचनाम्यात केलेला नाही. मी पोलीसांना त्या वस्तूचा उल्ल्ेख का केला नाही हे विचारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला सांगितले होते की एकच वस्तू दाखवू या. मी फक्त बोरमाळच पाहिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी तिन्ही वस्तू पाहिल्या होत्या हे मी खोटे सांगितले होते.

१३. मी एकूण तीन सह्या केल्या होत्या. आरोपीने पुन्हा रुम लॉक केली होती. रुमचे फोटो काढले होते. तेथून आम्ही पोलीस ठाण्यात आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा पोलीस ठाण्यात लिहून काढला होता. पंचनामा एक तास चालला होता. माझ्या समक्ष पोलीसांनी सोनाराला बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी दागिने सोन्याचे आहेत याबाबत खात्री माझ्यासमक्ष केली नाही. त्या दोन दागिन्यांची नोंद पोलीसांनी पंचनाम्यात केली किंवा नाही याची मी खात्री केली नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने पोलीस ठाण्यात निवेदन दिले हे मी खोटे सांगत आहे. आम्ही गेलो तेव्हा आजूबाजूचे लोक तेथे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, किल्ल्यात कोणीही ये जा करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की,

आजूबाजूला कॅन्टीन असल्यामुळे लोकांची ये जा चालू असते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे जाण्यासाठी परवानगी घ्यावी लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने घटनास्थळ दाखवले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथून मुद्देमाल जप्त केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या समक्ष लॉक उघडला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त झाला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दागिने हे पोलीसांकडे पूर्वीपासूनच होते. हे म्हणणे खरे नाही की, दागिने पोलीसांनीच त्या रुममध्ये ठेवलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष हातात घेवून दागिने बघितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी इ–साक्ष ॲपमध्ये फोटो काढले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्याने पोलीसांना मदत करण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०९/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.